मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# हिंजवडीत नाल्यावरील बांधकामावर हातोडा

## पीएमआरडीए नंतर एमआयडीसी ॲक्शन मोडवर; जवळपास 56 हून अधिक अतिक्रमणे काढली

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी, आयटी पार्कमधील नाल्यावर उभारण्यात आलेल्या डॉल्फीन कंपनीच्या बांधकामावर अखेर हातोडा पडला असून, नाल्यावरील ते बांधकाम काढून टाकण्यात येत आहे. पीएमआरडीएनंतर आता औद्योगिक विकास महामंडळानेदेखील बांधकामविरोधी कारवाईचा वेग वाढवला आहे. आयटी पार्कमध्ये पहिल्यांदा व्यापारी इमारतीवर कारवाई करण्यात आली आहे. आत्तापर्यंत जवळपास 56 हून अधिक अतिक्रमणे एमआयडीसीने काढली आहेत.

आयटी पार्कमधील नागरी समस्या सोडविण्यासाठी सर्वच विभाग एकत्रित आले आहेत.



दरम्यान, पीएमआरडीएच्या कारवाईनंतर एमआयडीसीकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याचे बोलले जात होते. आयटी पार्कजवळील डोहलर कंपनीजवळ नाला असून, या नाल्यावर बांधकाम करण्यात आले आहे; तसेच अन्य दोन ठिकाणीदेखील नाल्यावर बांधकामांना परवानगी देण्यात आली होती.

दरम्यान, नैसर्गिक नाल्याचा प्रवाह रोखल्यामुळे या कंपनीला यापूर्वीच काम थांबविण्याची नोटीस दिली होती; मात्र पुढील कार्यवाही झाली नव्हती. अखेर कारवाई सुरू करण्यात आली. नाल्यावर अनधिकृत बांधकात हटवले जाणार असून, त्यानंतर नाल्याचा प्रवाह हा खुला करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

> “ नाल्यावरील संबंधित कंपनीचे बांधकाम तोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. ते काम पूर्ण होण्यास आणखी दोन दिवस लागणार आहेत. त्यानंतर अन्य कंपन्यांवर देखील कारवाई केली जाणार आहे. तसेच, रस्त्यावर व पदपथवार देखील अतिक्रमण होवू नयेत, याची दक्षता घेतली जाणार आहे.
>
> **- राजेंद्र तोतला, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी.**

### उपमुख्यमंत्र्यांकडून कानउघाडणी

**» हिंजवडीतील नागरी समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने रस्त्यावर उतरलेले उपमुख्यमंत्री पवार यांनी एमआयडीसी अधिकाऱ्यांना सुनावले होते. या ठिकाणी उपमुख्यमंत्री येण्यापूर्वीच जेसीबी, पोकलेन ठेवल्याची चर्चा परिसरात होती; मात्र प्रत्यक्षात कारवाई होत नव्हती. अखेर आढावा बैठकीनंतर एमआयडीसीने तातडीने काम हाती घेतले.**

---

# चाकण औद्योगिक क्षेत्राची आता वाहतूक कोंडी-समस्यामुक्तीकडे वाटचाल!

## मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची बैठक; आमदार महेश लांडगे यांचा सकारात्मक पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी आणि पायाभूत सोयी-सुविधांबाबतच्या समस्यांवर ठोस उपायोजना झाल्या नाहीत. परिणामी, चाकरमानी, वाहनचालक आणि औद्योगिक कंपन्या त्रस्त झाल्या होत्या. मात्र, आता औद्योगिक क्षेत्र समस्यामुक्तीच्या दिशेने वाटचाल करील, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.

चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी आणि विविध समस्यांबाबत औद्योगिक संस्था संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनी #UNCLOG_CHAKAN_MIDC मोहीम हाती घेतली. तसेच, काही दिवसांपूर्वी आमदार महेश लांडगे यांची भेट घेतली आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी केली होती.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मुंबई येथील दालनामध्ये चाकण औद्योगिक क्षेत्र वाहतूक कोंडी आणि समस्यामुक्त करण्याबाबत महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या मावळ, खेड परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य अभियंता, एमएसआयडीसी, मुख्य अभियंता,



सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे, मुख्य अभियंता, एमआयडीसी, पुणे, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे, पोलीस उपायुक्त (वाहतूक), पिंपरी-चिंचवड, मुख्य अधिकारी, चाकण/तळेगांव नगरपालिका असे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

चाकण हे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील एक अत्यंत महत्त्वाचे औद्योगिक केंद्र असून, सध्या येथे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या औद्योगिक क्षेत्रापुरत्याच मर्यादित नसून, स्थानिक रहिवाशांच्या जीवनमानावरही प्रतिकूल परिणाम घडवत आहेत, अशी भूमिका मा. मंत्रीमहोदय यांच्यासमोर आमदार लांडगे यांनी मांडली.

### हिंजवडीप्रमाणे ‘सिंगल पॉईंट अ‍ॅथॉरिटी’ करा...


**» राष्ट्रीय महामार्ग क्र. ६० (नाशिक फाटा ते खेड) एलिव्हेटेड कॉरिडॉर भूसंपादन (पिंपरी-चिंचवड महानगरपालिका पीएमआरडी, एमआयडीसी, नॅशनल हायवे, पीडब्ल्यूडी किंवा जिल्हा परिषद अशा सर्व अस्थापनांशी समन्वय करण्यासाठी ‘सिंगल पॉईंट अ‍ॅथॉरिटी’) पिंपरी-चिंचवडमधून चाकण औद्योगिक पट्टयात प्रवेश करणाऱ्या रस्त्यांचा विस्तार आणि राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ (हडपसर ते यवत) आणि राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी (तळेगाव–चाकण–शिक्रापूर) काम सुरू करणे. यासह रस्त्यांचे विस्तारीकरण व देखभाल, वाहतूक नियंत्रण व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक सुधारणा, पार्किंग व्यवस्थापन, औद्योगिक वाहतुकीसाठी स्वतंत्र मार्ग (फ्रेट कॉरिडॉर), स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, नगरपालिका), MSRDC, PWD, RTO आणि पोलीस विभाग यांच्यात समन्वय करुन दीर्घकालीन वाहतूक मास्टर प्लॅन तयार करून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याची मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे. त्याला मंत्री महोदय यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.**

# महापालिकेचा पुणेकरांच्या आरोग्याशी खेळ!

## जीबीएस उद्रेक शमल्यानंतर राज्य प्रयोगशाळेला पाणी नमुने पाठवणे बंद

**पुणे | प्रतिनिधी**

गुईलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) उद्रेकानंतर शहरातील पाणी नमुने तपासणीसाठी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविण्यास झालेल्या प्रारंभात खंड पडला आहे. विशेष म्हणजे महापालिकेच्या आरोग्य विभागाने पत्र पाठवूनही गेल्या दोन महिन्यांपासून पाणीपुरवठा विभागाने तपासणीसाठी नमुने प्रयोगशाळेकडे पाठविलेलेच नाहीत.



पुण्यात ९ जानेवारीपासून जीबीएस उद्रेक होऊन रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली होती. सिंहगड रस्ता परिसरात हा उद्रेक झाला होता. दूषित पाण्यामुळे हा उद्रेक झाल्याचे आरोग्य विभागाच्या तपासणीत स्पष्ट झाले होते. त्या वेळी पुण्यात जीबीएसचे सर्वाधिक रुग्ण आढळले होते. त्यात पुणे महापालिका ४६, महापालिकेत नव्याने समाविष्ट गावे ९५, पिंपरी-चिंचवड महापालिका ३४, पुणे ग्रामीण ४० अशी रुग्णसंख्या होती. 'जीबीएस'मुळे १२ जणांचा मृत्यू झाला होता.

दूषित पाण्यामुळे 'जीबीएस'चा उद्रेक झाल्याने राज्याच्या आरोग्य विभागाने महापालिकेला पाणी नमुने तपासणीसाठी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर महापालिकेकडून नियमितपणे पाणी नमुने तपासणीसाठी पाठविण्यात येत होते. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून पाणी नमुने तपासणीसाठी पाठविणे थांबविण्यात आले आहे. विशेष म्हणजे महापालिकेच्या आरोग्य विभागाने पाणीपुरवठा विभागाला 'जीबीएस'च्या पार्श्वभूमीवर पाणी नमुने तपासणीसाठी राज्य प्रयोगशाळेकडे पाठविण्यासाठी वारंवार पत्रे लिहिली आहेत. तरीही, पाणीपुरवठा विभागाने त्यावर कार्यवाही केलेली नाही.

> पुण्यातील जीबीएस उद्रेकानंतर पुणे महापालिकेकडून पाणी नमुने तपासणीसाठी पाठविण्यात येत होते. गेल्या दोन महिन्यांपासून महापालिकेने पाणी नमुने तपासणीसाठी पाठविलेले नाहीत. या प्रकरणी महापालिकेला पत्र पाठविण्यात आले आहे.
>
> **– डॉ. विनोद फाळे, उपसंचालक, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा.**

> जीबीएस उद्रेकानंतर राज्याच्या आरोग्य विभागाने नागरिकांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला शहरातील पाण्याचे नमुने तपासणीसाठी राज्य प्रयोगशाळेत पाठविण्याबाबत पत्र लिहिले होते.
>
> **– डॉ. नीना बोराडे, आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका.**

> महापालिकेच्या स्वतःच्या प्रयोगशाळेत पाणी नमुन्यांची तपासणी केली जाते. त्यामुळे नमुने तपासणीसाठी राज्य प्रयोगशाळेत पाठविण्यात येत नव्हते. यापुढील काळात त्रयस्थ संस्थेकडून तपासणी व्हावी, यासाठी राज्य प्रयोगशाळेत पाणी नमुने पाठविण्यात येतील.
>
> **– नंदकिशोर जगताप, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पुणे महापालिका.**

---

# दिव्यांग बांधवांसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स उपयुक्त ठरेल; आयुक्त शेखर सिंह

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनमध्ये झाली सेंटरची सुरवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनमध्ये सुरू करण्यात आलेले सेंटर ऑफ एक्सलन्स केंद्र दिव्यांग बांधवांमधील कौशल्यांचे विश्लेषण करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. दिव्यांग व्यक्तीमधील कौशल्य शोधून त्यानुसार त्याला योग्य काम मिळवून देण्यासाठी या केंद्राची भूमिका महत्त्वाची असणार आहे,' असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशन येथे इनबेल इंडिया आणि रोहिणी संस्था यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे उद्घाटन आयुक्त सिंह यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, महापालिकेच्या उपायुक्त ममता शिंदे, सहाय्यक आयुक्त निवेदीता घार्गे, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, इनबेल इंडिया संस्थेच्या शांती राघवन, रोहिणी संस्थेचे अक्षय सरोदे यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, खासगी कंपनीचे प्रतिनिधी, दिव्यांग बांधव उपस्थित होते.

आयुक्त सिंह म्हणाले, 'दिव्यांग बांधवांसाठी वर्क प्लेस सोल्युशन शोधण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम महापालिकेच्या माध्यमातून राबवण्यात येत आहेत. दिव्यांगांना औद्योगिक क्षेत्रामध्ये काम मिळावे, यासाठी लवकरच एका कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. इनबेल इंडिया व रोहिणी संस्थेच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेले सेंटर ऑफ एक्सलन्समुळे आता दिव्यांग व्यक्तीमधील कौशल्य ओळखून, त्याचे विश्लेषण करून त्यानुसार त्यांना नोकरी देणे शक्य होणार आहे. दिव्यांग व्यक्तीला येणाऱ्या दैनंदिन अडचणींवर कशा प्रकारे ते मात करू शकता, याबाबतही माहिती या केंद्रातून मिळू शकरणार आहे. दिव्यांग व्यक्ती विविध क्षेत्रात कशा प्रकारे काम करू शकतात, याची माहितीही येथे मिळणार आहे. त्यामुळे हे केंद्र खऱ्या अर्थाने दिव्यांगांना सक्षम करण्यास उपयुक्त ठरणार आहे.'

व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख यांनी दिव्यांग भवनच्या कामाबाबत माहिती सांगताच दिव्यांग बांधवांचे सर्वेक्षण किती महत्त्वाचे आहे, याबाबत माहिती दिली. ते म्हणाले, 'दिव्यांगांच्या सर्वेक्षणातून जी माहिती संकलित होईल, त्याचे विश्लेषण करून कामाची गती वाढवता येईल. दिव्यांगांचे शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी याचा उपयोग होईल.'

उपायुक्त ममता शिदे म्हणाल्या की, 'दिव्यांग बांधवांसाठी काम करताना भाषेचा अडथळा कुठेही येणार नाही, याद्दष्टीनेही आम्ही नियोजन करीत आहोत. पुढील पाच वर्षात जास्तीतजास्त दिव्यांगांना कौशल्याआधारित रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यास प्राधान्य दिले जात आहे.'

### आयुक्तांनी घेतली सेंटर ऑफ एक्सलन्सची माहिती

**» सेंटर ऑफ एक्सलन्सचे उदघाटन केल्यानंतर त्याबाबत सविस्तर माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी इनबेल इंडियाच्या शांती राघवन व रोहिणी संस्थेचे अक्षय सरोदे यांच्याकडून घेतली. दिव्यांग व्यक्तीला येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी हे सेंटर कसे उपयोगी पडू शकते, याबाबत सविस्तर माहिती शांती राघवन यांनी दिली. तर, दिव्यांग बांधवांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी या सेंटरचा कसा उपयोग होऊ शकतो, याबाबत माहिती अक्षय सरोदे यांनी दिली.**

# पुण्यात बेशिस्त वाहनचालकांवर ‘एआय’चा बडगा

## तीन हजार बेशिस्तांवर कारवाई, फर्ग्युसन रस्त्यावर कारवाई, दुहेरी पार्किंग करणारे सर्वाधिक

**पुणे | प्रतिनिधी**

नामदार गोपाळकृष्ण गोखले रस्त्यावर (फर्ग्युसन रस्ता) वाहतूक पोलिसांनी बेशिस्तांविरुद्ध कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कॅमेऱ्यांद्वारे (एआय) कारवाई करण्यास सुरुवात केली. गेल्या दोन महिन्यांत तीन हजार २०० बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध एआय कॅमेऱ्यांद्वारे कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये दुहेरी पार्किंग करणाऱ्या एक हजार २८४ वाहनचालकांचा समावेश आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांवर बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी एआय तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. डेक्कन जिमखाना भागातील नामदार गोखले रस्त्यावर हे कॅमेरे बसविण्यात आले. २८ मे रोजी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन करण्यात आले. अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील या वेळी उपस्थित होते. गेल्या दोन महिन्यांत नामदार गोखले रस्त्यावर वाहतूक नियमभंग करणाऱ्या तीन हजार २०० वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. विरुद्ध दिशेने वाहन चालविणे, सम-विषम दिनांक न पाहता वाहन लावणे, एकाच दुचाकीवरून तिघांचा प्रवास, वाहन चालविताना मोबाइलवर संभाषण अशा प्रकारचे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

अ त्या धु नि क तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे वाहनचालकांना टिपत असून, नियमभंग केल्यास त्वरित वाहनचालकांना स्वयंचलित पद्धतीने संदेश मिळतो. नियमभंगानंतर साधारणपणे मिनिटभरात वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली जाते. नामदार गोखले रस्त्यावर वाहनचालकांकडून मोठ्या प्रमाणावर बेशिस्तपणे मोटारी लावण्यात येत होत्या. त्याचा त्रास स्थानिक रहिवाशांसह या भागातील दुकानदार, तसेच पादचाऱ्यांना होत होता. एआय कॅमेऱ्यांद्वारे कारवाई करण्यास सुरुवात केल्यानंतर नियमभंग करण्याचे प्रमाण कमी झाल्याचे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी सांगितले.

शहरातील प्रमुख रस्त्यांवर बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी एआय तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. डेक्कन जिमखाना भागातील नामदार गोखले रस्त्यावर हे कॅमेरे बसविण्यात आले. २८ मे रोजी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन करण्यात आले. अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील या वेळी उपस्थित होते. गेल्या दोन महिन्यांत नामदार गोखले रस्त्यावर वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. १५ जूनपासून आतापर्यंत पाच हजार ७७२ तक्रारी नागरिकांनी या ॲपच्या माध्यमातून केल्या आहेत. त्यापैकी चार हजार ३९९ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. काही नागरिकांनी अपूर्ण माहिती पाठविल्याने एक हजार २८० तक्रारींचा विचार करण्यात आला नाही.



### ‘पीटीपी ट्रॅफिकॉप’वर सहा हजार तक्रारी

» वाहतूक पोलिसांनी बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पीटीपी ट्रॅफिकॉप ॲप सुरू केले आहे. या मोबाइल ॲपद्वारे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांचे छायाचित्र नागरिक वाहतूक पोलिसांना पाठवू शकतात. १५ जूनपासून आतापर्यंत पाच हजार ७७२ तक्रारी नागरिकांनी या ॲपच्या माध्यमातून केल्या आहेत. त्यापैकी चार हजार ३९९ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. काही नागरिकांनी अपूर्ण माहिती पाठविल्याने एक हजार २८० तक्रारींचा विचार करण्यात आला नाही.

### नियमभंगाचा प्रकार कारवाईची संख्या

| नियमभंगाचा प्रकार | कारवाईची संख्या |
|---|---|
| » नो पार्किंग | १,२७९ |
| » दुहेरी पार्किंग | १,२८४ |
| » विरुद्ध दिशेने वाहन चालविणे | ६१७ |
| » एकाच दुचाकीवरून तिघांचा प्रवास | ३२ |
| » मोबाइलवर संभाषण | ८ |

# कार्यालयात जाण्यासाठी आता पुण्यात पर्यावरणपूरक पर्याय!

## रुटमॅटिक-इन्फोसिसच्या भागीदारीमुळे भविष्यात मोठा बदल, शहरातील प्रदूषणाची पातळी कमी होण्यास मदत...

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील नोकरदारांना कामावर जाण्यासाठी पर्यावरणपूरक पर्याय आता उपलब्ध झाला आहे. यासाठी कृत्रिम प्रज्ञाआधारित कार्यालयीन वाहतूक मंच (कॉर्पोरेट मोबिलिटी प्लॅटफॉर्म) असलेल्या रूटमॅटिकने इन्फोसिसच्या सहकार्याने पर्यावरणपूरक वाहनांचा नवीन ताफा सुरू केला. हा ताफा १०० टक्के डिझेल आणि पेट्रोलमुक्त आहे. या ताफ्यात सीएनजी आणि इलेक्ट्रिक इंधन पर्यायाच्या चार आणि सहा आसनी मोटारींचा समावेश आहे. यामुळे शहरातील प्रदूषणाची पातळी कमी होण्यास मदत होणार आहे.

पुण्यातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, यामुळे प्रदूषणातही वाढ होत आहे. गेल्या काही वर्षांत वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने रस्ते अपुरे पडू लागले आहेत. यामुळे शहरात सातत्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या कोंडीमुळेही हवा प्रदूषणात भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर स्वच्छ वाहतुकीच्या दिशेने रूटमॅटिकने पाऊल टाकले आहे. यासाठी इन्फोसिसशी भागीदारी केली आहे.

यामुळे शहरात कार्यालयीन वाहतूक क्षेत्रात पर्यावरण वाहतुकीच्या दिशेने पाऊल पडले आहे. यामुळे शहरातील प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे. शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी याचा फायदा होणार असून, नागरिकांच्या जीवनमानातही सुधारणा होणार आहे.

याबाबत रूटमॅटिकचे संस्थापक व मुख्याधिकारी श्रीराम कन्नन म्हणाले की, पुण्यात हरित वाहतुकीचा नवा मानदंड स्थापित करण्याची आघाडी आम्ही घेतली आहे. शहरात १०० टक्के डिझेल आणि पेट्रोलमुक्त वाहतूक सेवा सुरू करण्याचे पहिले पाऊल आम्ही उचलले आहे. यातून शाश्वत भविष्यासाठी कार्यालयीन वाहतूक क्षेत्रात अमूलाग्र बदलाच्या दिशेने वाटचाल अपेक्षित आहे.

आयक्यूएअरच्या जागतिक हवा गुणवत्ता अहवाल २०२४नुसार, जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरांपैकी १३ शहरे भारतातील आहेत. या वाढत्या प्रदूषणामध्ये वाहनांमुळे होणाऱ्या हवा प्रदूषणाचा मोठा वाटा आहे. रूटमॅटिकचा हा उपक्रम देशातील प्रदूषण कमी करण्यासाठी एक योग्य पाऊल ठरेल, अशी आशा आहे.




### साडेतीन लाख कर्मचाऱ्यांना सेवा

» रूटमॅटिकची स्थापना २०१३ मध्ये झाली. ही वाहतूक सेवा कंपनी आहे. कृत्रिम प्रज्ञेचा वापर करून कंपनीकडून प्रवाशांना सुरक्षित व विश्वासार्ह सेवा दिली जाते. कंपनी सध्या २३ शहरांतील ३०० कंपन्यांमध्ये साडेतीन लाख कर्मचाऱ्यांना सेवा पुरवते. रूटमॅटिकला ४ कोटी डॉलरची महत्त्वाची गुंतवणूक मिळाली आहे. ही गुंतवणूक कंपनीला भविष्यातील सेवा विस्तारासाठी महत्त्वाची ठरेल. कंपनीने मार्च २०२६ पर्यंत १० हजार वाहने ताफ्यात आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

# कुरुळी-कडवस्ती रस्त्याची दुरवस्था; ग्रामस्थांकडून संताप व्यक्त

## कुरुळी गावठाण ते चाकण एमआयडीसी कडवस्ती रस्त्याची अवस्था खड्ड्यांमुळे चाळणीसारखी झाली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी-कवठे येमाई जिल्हा परिषद गटात इच्छुक उमेदवारांनी कंबर कसली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेना पक्षातील फाटाफुटीमुळे उमेदवारी निश्चितीचे आव्हान पक्षश्रेष्ठींसमोर उभे ठाकले असून, या गटातील राजकीय समीकरणे जुळवण्यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे.

गेल्या पंधरा दिवसांत शिरूर तालुक्यातील अनेक इच्छुकांनी आयोजित केलेल्या आखाड पार्ट्यांनी राजकीय वातावरण तापले आहे. विशेषत: टाकळी हाजी-कवठे येमाई गटात माजी आमदार पोपटराव गावडे यांचे सुपुत्र राजेंद्र गावडे यांनी आयोजित केलेल्या आखाड पार्टीनं लक्ष वेधलं आहे. या कार्यक्रमाला उपस्थित जनसमुदाय पाहता राजेंद्र गावडे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) कडून उमेदवारी निश्चित मानली जात आहे.

रस्त्याच्या दुरवस्थेमुळे स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि वाहनचालकांचे हाल होत आहेत. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर बनते, कारण ओढ्याचे पाणी रस्त्यावर साचून खड्ड्यांची समस्या वाढते. ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर तातडीने रस्त्याची दुरुस्ती आणि कायमस्वरूपी उपाययोजना केल्या नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल.

दुसरीकडे, टाकळी हाजीचे माजी सरपंच आणि माजी पंचायत समिती सदस्य अरुणा घोडे यांचे पती दामू घोडे हे राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) कडून इच्छुक आहेत. तसेच, माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे हे माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील यांचे समर्थक म्हणून इच्छुक असले, तरी त्यांची भूमिका अद्याप गुलदस्त्यात आहे. शिवाजी आढळराव यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने गावडे आणि पोकळे यांच्यातील राजकीय समीकरणांची चर्चा जोरात आहे. गेली पन्नास वर्षे टाकळी हाजी-कवठे येमाई हा जिल्हा परिषद गट राष्ट्रवादी कॉंग्रेसचा (अजित पवार गट) बालेकिल्ला मानला जातो. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार पोपटराव गावडे यांचे या गटावर वर्चस्व आहे. उमेदवारांच्या मोर्चेबांधणीने गटातील राजकीय वातावरण तापले असून, येणाऱ्या काळात कोण बाजी मारणार, हे पाहणे औत्सुक्यपूर्ण ठरणार आहे.



### प्रशासनाचा दावा: प्रस्ताव पाठवला

» चाकण सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता संतोष पवार यांनी सांगितले की, "कुरुळी ते कडवस्ती रस्ता सिमेंट कॉंक्रीटचा करण्यासाठी पीएमआरडीए (पुणे मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटी) कडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. तसेच, रस्त्याची पाहणी करून खड्डे आणि साइड पट्ट्या भरण्याचे काम लवकरच सुरू होईल." मात्र, ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, प्रशासनाच्या या आश्वासनांना प्रत्यक्ष कृतीची जोड मिळणे गरजेचे आहे.

### शाळकरी विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात

» या रस्त्यालगत आनंद इंग्लिश मीडियम स्कूल, प्राथमिक शाळा आणि माध्यमिक विद्यालय आहे. खराब रस्त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचणे कठीण झाले आहे. खड्ड्यांमुळे आणि पावसाळ्यात रस्त्यावर साचणाऱ्या पाण्यामुळे विद्यार्थ्यांना धोका निर्माण झाला आहे. कविता कोतवाल, ग्रामपंचायत अधिकारी, यांनी सांगितले की, "पावसाळ्यात ओढ्याच्या पाण्याची पातळी वाढल्यानंतर रस्त्यावर पाणी साचते, ज्यामुळे खड्ड्यांची समस्या गंभीर बनली आहे. ग्रामपंचायत सरपंचांनी याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला अनेकदा पत्रे लिहिली, पण प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही."

### ग्रामस्थांचा इशारा

» माजी चेअरमन, विविध कार्यकारी सोसायटी, कुरुळी, रमेश बागडे यांनी प्रशासनावर ताशेरे ओढले. ते म्हणाले, "रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी खचलेल्या साइड पट्ट्या, खड्डे आणि गटारांच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची गरज आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी प्रामाणिकपणे काम केले नाही, तर ग्रामस्थ रस्त्यावर उतरून आंदोलन करतील." ग्रामस्थांनी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तातडीने पावले उचलण्याची मागणी केली आहे.

# झेडपी गटांच्या पुनर्रचनेत नव्या शिलेदारांना संधी?

## बारामतीची सत्ताकेंद्रे काबीज करण्यासाठी अजित पवार गटाची रणनिती

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद गट व पंचायत समितीच्या गणांची रचना जाहीर केली आहे. बारामती तालुक्यात गट व गणांची संख्या पूर्वीप्रमाणेच 6 व 12 अशी राहिली आहे. मात्र, नव्या पुनर्रचनेत सांगवी गणाचे अस्तित्व संपुष्टात आले. एकसंघ राष्ट्रवादीच्या फुटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाकडे आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती तसेच बारामती नगर परिषदेची सत्ता काबीज करण्याचे टार्गेट आहे.

त्यामुळे अजित पवार गटाकडून रणनिती आखली जात आहे. गेल्या अडीच वर्षांतील कालखंडात बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखाना, बाजार समिती, छत्रपती सहकारी साखर कारखाना, बाजार समिती यासह अन्य सहकारी संस्थांवर कब्जा केला आहे. या स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकारावर अजित पवार यांनी मजबूत पकड निर्माण केली आहे. त्यामुळे तळागाळापर्यंत अजित पवार यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे नेटवर्क भक्कम झाले आहे.

येत्या सहा महिन्यांत बारामती तालुक्यात बारामती नगर परिषद आणि जिल्हा परिषद आणि पंचायत समिती, माळेगाव नगरपंचायतीची निवडणूक होणार आहे. मागील झालेल्या निवडणुकीत अजित पवार गटाने विरोधक भाजप, शरद पवार गटाला चारीमुंड्या चीत केले आहे.लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांना पराभवाला सामोरे जावे लागल्यानंतर अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील रणनिती बदलून व्यापक प्रमाणात सुधारणा केल्या आहेत. याचे सकारात्मक परिणाम निवडणुकीतून दिसून आले आहेत.



### नवीन पिढीला वाव

» आगामी जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामती तालुक्यात नगरपरिषद आणि नगरपंचायत, झेडपीच्या निवडणुकीत तरूण पिढीला वाव देण्यात येणार आहे. यापूर्वीही अजित पवार यांनी तरूणांना सहकारी संस्थांवर संधी देत राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणले आहे. तोच पॅटर्न यंदाच्या निवडणुकीत राबविला जाणार आहे. तसेच संकेत मिळत आहेत.

### यंग ब्रिगेडची दुसरी फळी तयार

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गेल्या पाच वर्षात तरूणांचा सहभाग वाढविला आहे. तरूण निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी दिली असून त्यातून बारामतीच्या राजकीय पटलावर तरूणांची दुसरी फळी तयार करण्यात ते कमालीचे यशस्वी ठरले आहेत. ही तरूणांची दुसरी फळी राजकीय मैदानावर लढण्यासाठी लंबी रेस का घोडा याप्रमाणे सक्रिय झाली आहे.